**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी – १८**

**:- जाहिर निवेदन :-**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सन २०१४ – १५ चे अंदाजपत्रक नागरिकांचा सहभाग :- सर्व प्रभाग समितीमध्ये सन २०१४ – १५ चे अंदाजपत्रक तयार करताना नागरिकांनी सुचविलेली कामे विचारात घेण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार नागरिकांना त्यांच्या प्रभागातील / वॉर्डातील कामे सुचविण्याबाबत जाहिर प्रकटनाद्वारे कळविणेत येते की, आपल्या परिसराच्या गरजेनुसार आवश्यक व योग्य कामांचा समावेश अंदाजपत्रकात करणेसाठी नागरिक सुचना करु शकतील. त्यासाठी विहीत नमुन्यातील "नागरिक सुचना अर्ज " प्रत्येक प्रभाग कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये विनामुल्य वाटपाकरीता उपलब्ध आहेत. तसेच म.न.पा. वेबसाईट *www. pcmcindia. gov.in* वर उपलब्ध आहेत. सदर नागरिकांचे सुचना अर्ज दि. २५/१०/२०१३ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत संबंधित प्रभाग कार्यालयात स्विकारण्यात येतील. संबंधित प्रभाग अधिकारी व कार्यकारी अभियंता हे सुचविलेल्या कामांची शहानिशा करुन विकास कामांचा समावेश अर्थसंकल्पांत करतील याची सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**( श्रीकर परदेशी )**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८

जाहिरात क्र.
क्र. लेखा/६ /कावि/१४८३ /२०१३
दि. ४/१०/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८,लेखा विभाग
क्र. लेखा/ ६ /कावि/१४८१/२०१३
दिनांक :- ४/१०/२०१३

**विषय :- सन २०१४ – १५ चे अंदाजपत्रकात नागरिकांचा सहभाग**

**परिपत्रक,**

सन २००७ -२००८ पासुन महापालिकेचे अंदाजपत्रक तयार करताना नागरिकांच्या सुचनेनुसार आवश्यक कामांचा अंतर्भाव अंदाजपत्रकात करणे, असा उपक्रम महापालिकेने राबविलेला असून त्यासाठी वर्तमानपत्रात प्रसिध्दी करुन नागरिकांना काम सुचविणेबाबत जाहिर आवाहन करण्यात आलेले होते. त्याच धर्तीवर सन २०१४ -१५ चे अंदाजपत्रक तयार करताना सदर उपक्रमास नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळावा व अंदाजपत्रक तयार करताना प्रभाग कार्यालये, यांचे स्तरावर नागरिकांकडून त्यांच्या प्रभागात करावयाच्या कामांबाबत सुचनांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करणेसाठी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

१) लेखा विभागाकडून दैनिक वृत्तपत्रात जाहिर आवाहन प्रसिध्द करणेत येईल. त्याची प्रत व अर्जाचा नमुना प्रत्येक प्रभाग अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयाच्या दर्शनी ठिकाणी लावून या उपक्रमाची माहिती नागरिकांना द्यावी.
२) मा. प्रभाग समिती अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली प्रभाग समितीची बैठक प्रस्तुत प्रयोजनाचे विचारार्थ बोलविण्यात यावी. त्या बैठकीमध्ये प्रभाग समिती सदस्यांबरोबर, नागरिकांच्या अंदाजपत्रक सहभागाबाबत चर्चा घडवून आणावी. नागरिकांच्या सहभागातून अंदाजपत्रक तयार करणेबाबतचा प्रारुप कार्य आराखडा तयार करण्यात यावा.
३) एका कामाची रक्कम शक्यतो र.रु. १० लाखापेक्षा जास्त नसावी.
४) नागरिकांकडून आलेले कामांचे प्रस्ताव याबाबत संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडून छाननी करुन घेऊन कामांचा प्राधान्य क्रम ठरविण्यात यावा व त्यांचा समावेश प्रभाग समिती अंदाजपत्रकात करुन अंतिमत: मान्यतेसाठी पाठविण्यात यावेत.
५) सहभागी अंदाजपत्रक सन २०१४- १५ संदर्भातील नागरिक सूचना अर्ज भरण्या संदर्भातील माहिती, सर्व प्रभाग अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात नागरिकांना सूचना अर्ज वाटपासाठी विनामुल्य उपलब्ध करावयाचे आहे व नागरिकांकडून प्राप्त झालेल्या अर्जाची पोहच देऊन जाहिर केलेल्या तारखेस किती कामांचा समावेश अंदाजपत्रकात केला आहे ते जाहिर करावे.
६) मा. प्रभाग समितीच्या मान्यतेनंतर प्रभाग अधिकारी यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व प्रभागाची एकत्रित माहिती महापालिका अंदाजपत्रकात समाविष्ट करणेसाठी मा. आयुक्त यांचेकडे सादर करावी. त्यासोबत

७) सन २०१४ – १५ सहभागी अंदाजपत्रक नागरिकांनी सुचविलेली कामे

याबाबतचा लेखाशिर्षानुसार गोषवारा स्वतंत्र सादर करावा. नागरिकांनी सुचविलेल्या ज्या कामांचा समावेश अंदाजपत्रकात करण्यात आलेला नाही किंवा करणे शक्य नाही. त्याबाबतच्याकारणासह माहिती लेखा विभागाकडे दोन प्रतीत पाठवावी.

८) नागरिकांचे सूचना अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख २५/१०/२०१३ अशी असून त्यानंतर मा. प्रभाग समिती सभेस अंदाजपत्रक आराखडा सादर करुन त्यावर चर्चा करुन शिफारशीसह अंदाजपत्रक माहिती म.न.पा. अंदाजपत्रकात समावेश करणेसाठी िद २८/१०/२०१३ पुर्वी वेळेचे पालन करुन सादर करावी.

**सही/-**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८

**प्रति,**

१) प्रभाग अधिकारी
२) प्रभाग कार्यकारी अभियंता
३) स्थापत्य मुख्य कार्यालय
४) विद्युत मुख्य कार्यालय
५) पाणीपुरवठा मुख्य कार्यालय.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८
सहभागी अंदाजपत्रक सन २०१४ - २०१५
नागरिक सुचना अर्ज

| | |
|---|---|
| मतदार प्रभाग नंबर व नांव : | |
| नागरिकाचे नाव : | |
| नागरिकांच्या गटाचे/ संस्थेचे नाव : (आवश्यकता असल्यास) | |
| संपर्काचा पत्ता : | |
| दूरध्वनी क्रमांक : | |

| अ.क्र | कामाचे स्वरुप व स्थान | कामाचा सांकेतिक क्रमांक |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | | |
| | | |
| | | |

दिनांक :- / /२०१३

स्वाक्षरी :- ------------------

नाव :- --------------------

================================================

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंदाजपत्रक सन २०१४ - २०१५
नागरिक सुचना अर्ज पोहच

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नागरिकाचे नाव | | | | | | | | | | | |
| | दिनांक | | | | | | | अनुक्रमांक | | | |

कोणती कामे सुचविता येतील ?

आपल्या परिसरात कचरापेटीची व्यवस्था, फुटपाथ तयार करणे, रस्ते डांबरीकरण, दिवे लावणे, सिग्नल बसविणे, बस स्थानके, सार्वजनिक शौचालये, वृध्दांसाठी बैठक व्यवस्था करणे, बागा / उद्यानमधील सुधारणा इ. ज्यायोगे सुचविलेल्या कामाला १० लाखापेक्षा जास्त खर्च येणार नाही.

या निधीचा योग्य व पुरेपुर वापर व्हावा म्हणून कामे सुचविताना खालील काळजी घ्यावी.

खालील बाबींची विशेष काळजी घ्यावी.

- कामे सुचविताना मोठी कामे सुचवू नयेत जसे पूल, उड्डाणपुल, नवे रस्ते, भवन बांधकाम इ. १० लाखाची मर्यादा लक्षात ठेवावी.
- सुप्रिम कोर्टाने अवैध ठरविलेली कामे करण्याबाबतच्या सूचना महानगरपालिकेला स्वीकारता येणार नाहीत.
- नागरिक सूचनामध्ये कामाचे स्वरुप व स्थान अचूकपणे लिहावे. उदा:- औंध रावेत रस्त्यावर औंध पुल ते साई चौकापर्यंत पथदीप खांब उभारणे व दिवे लावणे.
- नागरिक सूचना अर्जातील रकाना क्र. ३ मध्ये खालील कोष्टकानुसार कामाचा सांकेतिक क्रमांक नमूद करावा.

| कामाचे स्वरुप | सांकेतिक क्रमांक | कामाचे स्वरुप | सांकेतिक क्रमांक | कामाचे स्वरुप | सांकेतिक क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| इमारती | १ | सार्वजनिक वाहनतळ | ६ | माहिती फलक/ नामफलक | ११ |
| लोकारोग्य | २ | पाणीपुरवठा | ७ | रस्ते दुभाजक व दुभाजक सुधारणा | १२ |
| पथ | ३ | मलनि:सारण | ८ | सार्वजनिक वाचनालय | १३ |
| रस्त्यावरील दिवे | ४ | बागा/उद्याने/ जॉगिंग ट्रॅक/बैठक व्यवस्था | ९ | रस्त्याच्या कडेला झाडे व बैठक व्यवस्था | १४ |
| वाहतुक नियंत्रण दिवे | ५ | कचरा व्यवस्थापन | १० | इतर | १५ |

* "लोकारोग्य" या लेखाशिर्षामध्ये खालील कामांचा समावेश आहे.

स्मशानभूमी, घाट, आरोग्य निरीक्षक केबिन, कचरा कुंडया व कचरा डेपो, कोंडवाडा, कत्तलखाना, गावठाण गटर्स, नाला ट्रेनिंग, सरफेस गटर्स, संडास मुता-या.

- अनुषंगिक सूचना :
- वरील प्रकारची कामे सुचविताना जागेचा रितसर ताबा, प्रकल्पांची निकड व आवश्यक बाबींची पुर्तता करणे शक्य असेल अशाच कामांचा समावेश अंदाजपत्रकात केला जाईल.
- मागणी केलेल्या कामांची तपशिलवार मांडणी केली जावी. उदा:- कामाचा प्रकार, कामाचा तपशिल व ठिकाण.
- अंदाजपत्रकातील कोष्टका बाहेरील असलेल्या सूचना ज्याकरीता अंदाजपत्रकामध्ये पैशाची तरतूद करणे आवश्यक नसते अशा सूचना टाळाव्यात. उदा: कर्मचा-यांची नियुक्ती किरकोळ दुरुस्त्या, स्वच्छता इ.
- सदर अर्ज सादर करण्याची दि. २५/१०/२०१३ आहे. अंतिम तारखेनंतर सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
- सदरचा नागरिक सूचना अर्ज हा आपल्या राहत्या प्रभाग कार्यालयात सादर करता येईल. अन्य विभागाकडे अर्ज सादर करता येणार नाही.

महापालिका कार्यालय, प्रभाग कार्यालय व नागरिक सुविधा केंद्रावर याबाबतचे नमुने उपलब्ध आहेत त्या नमुन्यात आपल्या सुचना सदरपैकी कोणत्याही कार्यालयात पोहोचवाव्यात. आपल्या अर्जाचा जो दाखल क्रमांक असेल त्यांच्या आधारे हे काम अंदाजपत्रकात स्वीकारले गेले किंवा नाही व नसल्यास त्याबाबतची कारणे कळू शकतील.

**प्रक्रिया कशी होईल -**

दि. ५/१०/२०१३ पासून दि. २५/१०/२०१३ पर्यंत नागरिकांनी दिलेल्या नमुन्यात कामे सुचवायची आहेत. नंतर त्या कामांचे पूर्णगणनपत्रक (Estimates) तयार केली जाईल.

दि. २८/१०/२०१३ रोजी समाविष्ट कामांची अंतिम यादी जाहीर होईल.